महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य
दूसरा व तिसरा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर, कॅम्प, पुणे -०१

**दूरध्वनी क्र. ०२०-२६१३७११०** **Email ID :**statecordinatormahaferfar@gmail.com
**Web site :** https://mahabhumi.gov.in

---

क्र.रा.भू.अ.आ.का.४/रा.स. / मा.सु. / / २०२१ दिनांक : ७/५/२०२१

प्रति,

उप जिल्हाधिकारी तथा डी.डी.ई. (सर्व)

विषय- सातबारावर भोगवटदाराच्या नावामध्ये क्रमांक असलेले सर्व्हे/गट क्रमांक तपासणे बाबत...

महोदय,

ई-महाभूमी प्रकल्प अंतर्गत कार्यान्वित असलेल्या ई-फेरफार प्रणालीत री-एडिट काम करत असताना समान नावाची दोन व्यक्ती असल्यास त्यांची खाती वेगवेगळी असल्यास त्यापैकी प्रत्येक खात्यात असणारे आडनाव च्या पुढे टोपण नाव या सदरी टोपण नाव नमूद करणे आवश्यक होते अशी दोन व्यक्ती आहेत असे लक्षात न आल्यास अशा खात्याचे एकत्रीकरण झाल्याची शक्यता नाकारता येत नाही अशा दोन भिन्न व्यक्तीची खाती यापूर्वीच एकत्र झालेली असल्यास ते खाते संबधित गटावरून वगळून संबधित गटावर टोपण नाव नमूद केलेले खाते समाविष्ट करणे आवश्यक होते. मा जमाबंदी आयुक्त पुणे यांनी त्यांच्याकडील 19 जून 2018 च्या परिपत्रकानुसार री एडिट कामकाज दुरुस्त करून घेण्यासाठी एक कालबद्ध कार्यक्रम आखून दिला होता. या परिपत्रकाचा फायदा घेऊन समान नावाची एकत्र झालेली खाती शोधून दोन्ही व्यक्ती कडून आधार कार्ड मतदान ओळखपत्र इ. आनुषंगिक पुरावा घेऊन व काय टोपण नाव नमूद करायचे हे लेखी घेऊन असे अर्ज 155 साठी सादर करता येत होते. तरीदेखील आजही काही ठिकाणी खातेदाराचे टोपण नावे योग्य पद्धतीने लिहिलेली दिसून येत नाहीत. तसेच भोगवटदाराच्या नावामध्ये टोपण नाव या रकान्यात क्षेत्र, भूखंड क्रमांक/ सदनिका क्रमांक / गाळा क्रमांक / हिस्सा क्षेत्र लिहिलेले दिसून येतात हे योग्य नाही.

त्याअनुषंगाने ई फेरफार प्रणालीत खातेदाराचे टोपण नाव रकान्यात क्रमांक नमूद असलेली माहिती दर्शविणारा एक अहवाल देण्यात आलेला आहे. पुष्कळ वेळा **भोगवटदाराच्या नावामध्ये** क्षेत्र नमूद केलेले असते तसेच नावासमोर पैकी -- एवढे क्षेत्र असे नमूद असते तसेच एकुम्या प्रकारची खातेदाराच्या बाबतीत (व इतर 5) असे क्रमांक दिलेले आहेत तसेच सोसायटी अथवा संस्था असल्यास र. न. 222 म्हणजे रजिस्ट्रेशन नंबर असे नमूद आहे ...प्रत्यक्षात **भोगवटदाराच्या** सदरी फक्त पहिले नाव, मधले नाव, आडनाव व टोपण नाव अपेक्षित आहे त्यात टोपण नावात क्रमांक अपेक्षित नाहीत. याकरिता संबंधित तलाठी यांना सदर अहवाल उपलब्ध करून देण्यात आलेला आहे त्यानुषंगाने तो तपासून ई फेरफार प्रणालीतील खाता दुरुस्ती या पर्यायाचा वापर करून योग्य त्या दुरुस्त्या कराव्यात.


AnyDesk
891186339
https://mahaferfamas.enlightcloud.com/scotestsite5/repo_own
::डिजिटल इंडिया भूमी अभिलेख...
७/१२ पहा
File Edit View Favorites Tools Help
नवीन काय ?
पासवर्ड बदला
बाहेर पडा
मदत
आमच्या विषयी
७/१२ वरील पोटखराब क्षेत्र खातेदारा समोर नमुद नसलेल्या सर्व्हे क्रमाकाची यादी
खाता प्रकार निहाय सर्व्हे क्रमाकाची सख्या
बंद झालेली व इमॅजिनरी फेरफार असलेल्या खात्यांची यादी
७/१२ खात्यावरील खातेदारांची संख्या
खाता नोंदणी व ७/१२ वरील खात्यांच्या नावामध्ये फरक असलेल्या खात्यांची माहिती
क्षेत्र निहाय खातेदारांची माहिती यादी
क्षेत्र निहाय खातेदारांची संख्या
खातेदार नसलेले सर्वे क्रमांक याची यादी
नावामध्ये क्रमांक असलेल्या खातेदारांची यादी
नावामध्ये क्रमांक असलेल्या खातेदाराची यादी
१०० किंवा १०० पेक्षा जास्त खातेदार असलेल्या सर्व्हे क्रमाकाची यादी
your computer at risk.
Fix settings for me
Settings
https://mahaferfamas.enlightcloud.com/scotestsite5/repo_ownersNamesWithDigits.aspx
Type here to search
ENG
11:46
07-05-2021
Type here to search
रामदास जगताप, ...
891186339 - An...
AnyDesk
New Microsoft ...
ENG
11:46 AM
5/7/2021




| अनुक्रमांक | खाता क्रमांक | खातेदारचे नाव | सर्वे क्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | 23 | संचालक सर्च सोसायटी फार एज्युकेशन ॲक्शन ॲंड रिसर्च इन कम्युनिटी हेल्थ गडचिरोली र.न.३५/८५ तर्फे डॉ. अभय बंग गडचिरोली | 10/1, 65, 9 |
| 2 | 3013 | संचालक सर्च सोसायटी फार एज्युकेशन ॲंड रिचर्स इन कम्युनिटी हेल्थ गडचिरोली तर्फे अभय बंग र. नं.३५/८५ गडचिरोली | 11 |
| 3 | 3017 | सोसायटी फार एज्युकेशन ॲक्शन ॲंड रिचर्स इन कम्युनिटी हेल्थ सर्च गडचिरोली र. नं. एफ २२४ | 10/2, 79 |

थोडक्यात आपल्या कडील अभिलेखात खातेराचे नाव योग्य पद्धतीने लिहिलेले असावे त्यात टोपण नावाच्या रकान्यात नोंदणी क्रमांक / क्षेत्र/ व इतर ५ / सदनिका क्रमांक / फ्ल्याट क्रमांक नमूद केलेल असू नये .

सदरच्या सूचना सर्व वापरकर्ते यांचे निदर्शनास आणून द्याव्यात हि विनंती

आपला विश्वासू

(रामदास जगताप)
उप जिल्हाधिकारी तथा राज्य समन्वयक
ई- फेरफार प्रकल्प, जमाबंदी आयुक्त कर्यालय, पुणे

प्रत मा. उप आयुक्त (महसूल) , विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व) यांना माहिती साठी